# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४११००४

परिपत्रक क्रमांक रा.मं/पापुअ/पापुई/इ. १२ वी मूल्यमापन आराखडा/वेबसाईट/३८५५
दिनांक-१०/०९/२०२०.

संदर्भ: १) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.(२४३/१९)/एसडी-४, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, दि.०८ ऑगस्ट २०१९.
२) परिपत्रक क्र.रा.मं./पापुअ/पापुई/संशोधन/इ.११वीची विषय योजना व सुधारित मूल्यमापन योजना/४२४१, दि.१६/०८/२०१९.
३) शासन पत्र क्र.संकीर्ण ०८२०/प्र.क्र.१२१/एसडी-२, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, दि.०८ सप्टेंबर २०२०.

विषय: इ.१२ वीच्या भाषेत्तर(**इतिहास,भूशास्त्र, राज्यशास्त्र, बालविकास, वस्त्रशास्त्र, तर्कशास्त्र, अर्थशास्त्र, पुस्तपालन व लेखाकर्म, व्यापार संघटन, चिटणीसांची कार्यपध्दती, सहाकार, कृषीविज्ञान, माहिती तंत्रज्ञान-विज्ञान,कला व वाणिज्य, शिक्षणशास्त्र, पर्यावरण व जलसुरक्षा**) या विषयांचे सुधारित मूल्यमापन आराखडे, घटकनिहाय गुणविभागणी व अंतर्गत मूल्यमापन योजना इत्यादींबाबत.....

या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात येते की, इयत्ता १२ वी च्या पुनर्रचित अभ्यासक्रमाची व नवीन पाठयपुस्तकांची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून सुरु करण्यात आलेली आहे. तसेच इयत्ता १२वी च्या भाषेत्तर गटातील **इतिहास,भूशास्त्र, राज्यशास्त्र, बालविकास, वस्त्रशास्त्र, तर्कशास्त्र, अर्थशास्त्र, पुस्तपालन व लेखाकर्म, व्यापार संघटन, चिटणीसांची कार्यपध्दती, सहाकार, कृषीविज्ञान, माहिती तंत्रज्ञान-विज्ञान,कला व वाणिज्य, शिक्षणशास्त्र, पर्यावरण व जलसुरक्षा** या विषयांच्या सुधारित मूल्यमापन योजनेची अंमलबजावणीही शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून सुरु करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयाव्दारे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून इयत्ता १२ वीची सुधारित मूल्यमापन योजना निश्चित करण्यात आलेली आहे. मंडळाने विषय तज्ज्ञामार्फत शासन निर्णयातील निर्देशानुसार तयार केलेली तपशीलवार मूल्यमापन योजना, घटकनिहाय गुणविभागणी व अंतर्गत मूल्यमापन योजना यास संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे निश्चित केलेल्या सुधारित मूल्यमापन योजना व तदनुषंगीक बाबींना अनुसरुन राज्य मंडळामार्फत विषयनिहाय **ऑनलाईनव्दारे** प्रशिक्षण नजीकच्या काळात आयोजित करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणात विषय शिक्षकांना विषयनिहाय मूल्यमापन आराखडे व अन्य तपशील अवगत करुन देण्यात येणार आहेत. उपरोक्त प्रमाणे शासन मान्यताप्राप्त इ.१२ वीचे मूल्यमापन आराखडे, घटकनिहाय गुणविभागणी व अंतर्गत मूल्यमापन योजना या परिपत्रकासह मंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

२....

वरील सर्व सूचना आपल्या विभागातील मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळां/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून दयाव्यात. सदर परिपत्रकात दर्शविलेल्या मूल्यमापन आराखड्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

आदेशान्वये.

(डॉ. अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ, पुणे ०४

क्र.कोविमं/12वी/सु.मु.यो/ 5055
कोल्हापूर.
दि.21/09/2020

प्रति,
प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

उपरोक्त दर्शविलेल्या परिपत्रकान्वये सर्व सुचनांची नोंद घेऊन सुधारित मुल्यमापन आराखड्याबाबत सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्याची कार्यवाही करावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.